बुधवार दि.१० एप्रिल २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : २२९
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक लोकनेता
बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत    संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | www. lokneta.com

## अपना नेता कैसा हो रविकांत तुपकर जैसा हो जनतेच्या तोंडून जयघोष

# माँ जिजाऊंचे आशीर्वाद घेऊन मातृतीर्थ सिंदखेड राजा येथून रविकांत तुपकर यांच्या प्रचाराला सुरुवात

लोकनेता न्यूज नेटवर्क
सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत

येत्या २६ एप्रिल रोजी होणाऱ्या बुलढाणा लोकसभा मतदार संघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दि ' ९ एप्रिल रोजी गुढीपाडवा सणाच्या शुभमुहूर्तावर सिंदखेडराजा येथील राजवाड्यामध्ये राष्ट्रमाता माँ जिजाऊ यांचे आशीर्वाद घेऊन बुलढाणा लोकसभेचे अपक्ष उमेदवार
रविकांत तुपकर यांनी आपल्या प्रचाराचा नारळ फोडला, यावेळी त्यांनी उपस्थित असलेल्या हजारो जनसमुदायापुढे आपली भूमिका स्पष्ट केली, बुलढाणा जिल्ह्याला आपल्याला संधी मिळाली तर विकासाचे मॉडेल बनवणार असून लोणार सिंदखेडराजा त्याचबरोबर बुलढाणा येथील सरकारी दवाखाना संत चोखोबा जन्मस्थळ,त्याचबरोबर ज्या ठिकाणी विकासात्मक कामे झालीच नाही अशा ठिकाणी आपण विकासात्मक कामे करून बुलढाणा जिल्ह्याला एक विकासाचे मॉडेल बनवणार असून आपल्याला लोकसभेत जाण्याची संधी द्यावी असे आवाहन त्यांनी केले,त्याचबरोबर आपण सुशिक्षित बेरोजगारांसाठी लढा देत आहोत अंगणवाडी सेविका असेल जुनी पेन्शन धारक असतील अतिक्रमण धारक असतील अशा सर्वांचे प्रश्न आपण या अगोदरही सोडवण्यासाठी प्रयत्न केले असून कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांनी मला संधीचं सोनं करण्याची संधी द्यावी असे आवाहन यावेळी तुपकर यांनी उपस्थित त्यांना केले,
तसेच आपण केलेल्या आंदोलनामुळे पिक विम्याची





रक्कम अनेक शेतकऱ्यांना मिळाली असून बुलढाणा जिल्ह्याचे खासदार प्रतापराव जाधव यांनी संसदेमध्ये एकही शब्द सोयाबीन कापसावर विचारला नाही , तसेच सहनिक संस्थांच्या जमिनी त्यांनी घशात घालण्याची काम केले असून खा प्रतापराव जाधव यांच्या सांगण्यावरूनच पोलिसांनी बुलढाणा येथे माझ्यावर व कार्यकर्त्यावर लाठी चार्ज केला होता असा गौप्यस्फोट सुद्धा तुपकर यांनी केला ,तसेच बुलढाणा येथून पोलिसांनी खासदार प्रतापराव जाधव यांच्या सांगण्यावरून मला मेहकर येथे नेले होते असे सुद्धा तुपकर यांनी सांगितले , तुझ्या कार्यकर्त्यांनी माझे फोटो स्टेटस वर ठेवले त्या कार्यकर्त्यांना धमकवण्याचे काम खासदार जाधव यांचे चेले करत असल्याचा घनाघात सुद्धा तुपकर यांनी केला ,
आमच्या कार्यकर्त्याला जर धमकावले तर जसेच तसे उत्तर देऊ असा सज्जड इशारा सुद्धा तुपकर यांनी दिला. या वेळी अपना नेता कैसा हो रविकांत तुपकर जैसा हो अशा घोषणा दिल्या जात होता. पुढे बोलताना शेतकरी नेते रविकांत तुपकर म्हणाले खासदार प्रतापराव जाधव यांचे कार्यकर्ते आमच्या कार्यकर्त्याला फोन करून धमक्या देत आहे. या पृथ्वीवर जेव्हा जेव्हा अशा दृष्ट प्रवृत्ती वाढत असतात त्या त्या वेळेस रविकांत तुपकर सारख्या फाटक्या माणसाचा जन्म होत असतो. ही निवडणूक जात-पात धर्म पक्ष बाजूला ठेवून लढायची आहे ही निवडणूक सोयाबीन कापूस व शेतकऱ्यांच्या मुद्द्यावर लढायची आहे. खासदार जाधव म्हणतात दिल्लीत खासदारांना काहीच काम नसते नुसता आराम करायचा असतो. आता त्यांना कायमस्वरूपी आराम द्या आपले उमेदवारी चिन्ह आहे पाना आता विरोधकाचे नट बोल्ट ढिल्ले करून पाना निवडून आणायचा आहे. विरोधक निवडणुकीच्या काळात रविकांत तुपकर यांच्यावर हल्ला करण्याची धमक्या देत आहेत. माझ्या कार्यकर्त्याला धमकी येत आहे त्यांचे फोन रेकॉर्ड करा आणि व्हायरल करा खासदार जाधव यांना माझे ओपन चॅलेंज आहे हिम्मत असेल तर अपक्ष निवडणूक लढवून दाखवा कापूस सोयाबीन व इतर विषयावर मी अनेक वेळा मोर्चा काढले. परंतु आकाशापोटी खासदार प्रतापराव जाधव यांनी मला अटक केली असा घणाघात तुपकर यांनी केला. इथे समोर बसलेले माझे मायबाप शेतकरी तुम्ही प्रत्येक जण रविकांत तुपकर आहे आणि प्रत्येक जण खासदार होणार आहे मी खासदार झाल्यावर प्रत्येकाला वाटेल आपण स्वतः खासदार झालो.

**प्रचाराच्या शुभारंभा साठी बीड मधील कार्यकर्ते उपस्थित**
रविकांत तुपकर यांच्या प्रचाराचे रणशिंग फुंकले गेले या प्रसंगी बीड मधील पाटोदा तालुक्यातील शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते राजाभाऊ देशमुख व त्यांचे एक साथीदार हे उपस्थित होते.

**शेतकऱ्यांचा कणखर बाणा निवडून आणा रविकांत तुपकर यांचा पाना**
अशा घोषणा उपस्थित लोकांनी दिल्या .सभेच्या सुरुवातीला प्रास्ताविक प्रकाश गीते यांनी केले तसेच शाहीर राजपूत यांनी, गर्जा महाराष्ट्र माझा हे गीत सादर करून उपस्थित असलेल्या रसिकांची वाहवा मिळवली, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मस्के यांनी केले, सभेनंतर शहरातून प्रचंड मोठ्या जनसमुदायाच्या उपस्थितीमध्ये भव्य रॅली काढण्यात आली.

# सेनगाव कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये गुढीपाडव्यानिमित्त हळद विक्रीचे उद्घाटन

## शेतकऱ्यांना मिळाला पंधरा हजार सहाशे प्रति क्विंटल भाव

लोकनेता न्यूज नेटवर्क
सेनगाव । महादेव हरण

सेनगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने आज दिनांक ९ एप्रिल रोजी गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर हळदीचे विक्री केंद्राचे उद्घाटन करण्यात आले होते या कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये अनेक शेतकऱ्यांनी हळद विक्रीसाठी आणली होती लिलाव करून व्यापाऱ्यांनी हळद खरेदी केली
या उद्घाटन प्रसंगी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोकराव ठेंगल सचिव , कर्मचारी ,संचालक सोंडू पाटील ,संचालक अंकुश तिडके ,शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाध्यक्ष



संदेश देशमुख, नगरसेवक वैभव देशमुख, संचालक बिजूभाउ (विजय )तोष्णीवाल, संचालक बाळासाहेब पोले, व आदी मान्यवर उपस्थित होते, या बाजार समितीमध्ये शेतकऱ्यांच्या हळदीला योग्य भाव व लिलाव करून व्यापाऱ्यांनी हळद खरेदी केली होती तर उचित भाव १५६०० प्रतिक्विंटल भावाने हळदी खरेदी करण्यात आली होती यावेळी खरेदी करणारे व्यापारी प्रकाश भाऊ बिडकर, विष्णू भाऊ सोनटक्के, राहुल भाऊ तोष्णीवाल, शिवाजी देशमुख ,संतोष देशमुख, व आदी व्यापाऱ्यांनी हळद खरेदी केली होती,

# संतश्री रानबा महाराज मंदिर येथे गुढीपाडवा उत्सव साजरा

लोकनेता न्यूज नेटवर्क
बीड । विजय रोडे

परळी वैजनाथ येथील संत श्री रानबा महाराज मंदिर येथे आज मंगळवार दिनांक ९ एप्रिल रोजी सकाळी नऊ वाजता हिंदू धर्मियातील नववर्ष गुढीपाडवा उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त संत श्री रानबा महाराज यांची उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विधिवत पूजा व आरती करण्यात आली. भजन कीर्तन असे विविध धार्मिक कार्यक्रम यावेळी पार पडले. यावेळी भाविक भक्तांना खिचडी प्रसादाचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास परळी शहर व पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.
प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी परळी वैजनाथ येथील



पंचायत समिती समोर असलेले संत श्री रानबा महाराज यांचे मंदिर आहे. गुढीपाडवा नववर्षानिमित्त संत श्री रामभाऊ महाराज मंदिर फुलांनी सजविण्यात आले होते. दिवसभर भजन कीर्तन असे विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले. उपस्थित भाविक भक्तांचे स्वागत श्री ज्ञानेश्वर खर्डे ,रामेश्वर खर्डे, पांडुरंग खर्डे यांनी केले.
यावेळी जय महाराष्ट्र प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष अतुल दुबे, गजानन दंदे सर, बालाजी सोळंके, ईश्वर राऊत, बालाजी गर्जे, माऊली आवाड, सुरेश बनसोडे, शेख जावेद भाई, अतुल गडेकर, शिवाजी दंदे, दहिवडे मामा, ज्ञानेश्वर दंदे, ओम खर्डे, काना केंद्रे, अनंत चाटे, शिवाजी फड यांच्या सह भाविक भक्त उपस्थित होते.

# कडबा घेऊन जाणाऱ्या वाहनाने घेतला पेट

लोकनेता न्यूज नेटवर्क
जिंतूर । प्रतिनिधी

तालुक्यातील जोगवाडा येथे कडबा भरून जाणाऱ्या आयशर वाहनाचा विद्युत ताराला घर्षणामुळे शॉर्ट सर्किट होऊन कडब्यासह आयशर जळून खाक झाल्याची घटना दिनांक ८ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास घडली आहे.याबाबत मिळालेली अधिक माहिती अशी की जिंतूर तालुक्यातील सोनापूर तांडा येथून आयशर वाहन क्र चक ०७ उ ५३२९ मध्ये कडबा भरून जोगवाडा गावातून जात असताना लोंबकळणाऱ्या तारेला धक्का लागल्यामुळे शॉर्टसर्किट झाल्यामुळे अचानक चालत्या आयशर वाहनातील कडब्याने पेट घेतला यावेळी भरवस्तीत कडब्याने पेट घेतल्यामुळे मोठे नुकसान होईल म्हणून चालकाने प्रसंगावधान राखत आयशर वाहनाला गावाच्या बाहेर नेऊन उभे केले यामुळे मोठा अनर्थ टळला दरम्यान गावातील नागरिकांनी आग विझवण्याचा प्रयत्न केला मात्र आग आटोक्यात आली नाही यावेळी घटनास्थळी अग्निशमन दालने हजर होऊन आग आटोक्यात आणली मात्र कडब्यासह आयशर पूर्णतः जळून खाक झाले आहे घटनेत लाखोंचे नुकसान झाले आहे

## चारोळी

दुसऱ्याच्या जगण्याच्या
आपण का अर्थ शोधत बसावा
स्वतःच जगणंच मस्त असावं
सुंदर आकार त्यात गिरवावा.

रंजना सानप
मायणी (सातारा)

# बाळापूर येथील भीम जयंती मंडळ अध्यक्षपदी गंगाधर जाधव, सचिव कीर्तीराज गायकवाड ,प्रेम कुमार घाटे, सहसघटक ,निमंत्रकपदी चंद्रभीम हौजेकर यांची निवड









लोकनेता न्यूज नेटवर्क
धर्माबाद । साहेबराव दुगाने

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीच्या निमित्ताने सिद्धार्थ नगर बाळापूर येथील विश्वशांती बुद्ध विहाराच्या प्रमाणात बौद्ध समाज बांधवांची महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली या नियोजित बैठकीत भीम जयंती मंडळ सिद्धार्थ नगर बाळापुर कार्यकारणी गठीत करण्यात आली. यावेळी समाजातील सामाजिक दृष्टिकोनातून काही ठराव पारित करण्यात आले आहेत. विघ्न संतोषी आणि मद्य प्राशन करून धिंगाणा करणाऱ्यांसाठी रू.५००० दंड असे महत्त्वपूर्ण ठराव घेण्यात आले आहेत. या बैठकीत सर्वांच्यामते भीम जयंती मंडळाची कार्यकारीणी गठित करण्यात आली असून ती पुढील प्रमाणे अध्यक्षपदी- गंगाधर गंगाराम जाधव,उपाध्यक्षपदी- गंगाधर रामजी सूर्यवंशी, उपाध्यक्ष -गंगाप्रसाद भिमराव सोनकांबळे, सचिव -कीर्ती राज भगवान गायकवाड, सहसचिव- आकाश नागोराव झुंजारे, कोषाध्यक्ष- गंगाधर मरिबा कोठारे, सह कोषाध्यक्ष- विनोद बाबुराव पहेलवान, निमंत्रक - चंद्रभिम गंगाधर हौजेकर, सह निमंत्रक-भीमराव लालू खंडेलोटे संघटक- घाटे प्रेम कुमार, सहसंघटक साहेबराव सोनकांबळे, सल्लागार सुधाकर तुकाराम जाधव, श्रीपाल सोनकांबळे, यशवंत सूर्यवंशी,लक्ष्मण सोनकांबळे, संजय झुंजारे, दिलीप झुंजारे, विठ्ठल वाघमारे, बळीराम घाटे, रमेश कोठारे, विजय सूर्यवंशी, लक्ष्मीकांत सूर्यवंशी, दर्शन पहेलवान, गौतम पहेलवान, चंद्रमणी गायकवाड, अनमोल गायकवाड आदींची कार्यकारणी सर्वानुमते गठित करण्यात आली आहे या निवड झालेल्या सर्व कार्यकारिणी मंडळातील पदाधिकाऱ्यांचे सर्वत्री कडून अभिनंदन आणि कौतुक केले जात आहे.

## पाटोदा पोलीस स्टेशन च्या वतीने मुस्लिम बांधवांना ईफ्तार पार्टी...

# हिंदू-मुस्लिम समाज बांधव आपण सर्व एकच-पोलीस निरीक्षक अनमोल केदार



लोकनेता न्यूज नेटवर्क
पाटोदा । प्रतिनिधी

प्रतिवर्षी प्रमाणे या वर्षी ही पाटोदा पोलीस स्टेशनचे पोलिस निरीक्षक अनमोल केदार यांनी पाटोदा शहरातील हिंदु-मुस्लिम बांधवांसाठी ईफ्तार पार्टीचे आयोजन केले होते. या वेळी सहकार महर्षी रामकृष्ण बांगर, पाटोदा नगर पंचायतचे नगराध्यक्ष राजुभैय्या जाधव, भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे भाई विष्णुपंत घोलप, बाबासाहेब जाधव, नगरसेवक महादेव जाधव, नगर पंचायत सभापती रामेश्वर गोरे, गणेश कवडे, रिपाइंचे नरेंद्र जावळे, संदीप जावळे, तात्या गांगुर्डे, सुरेंद्र बाबा तिपटे, जय जाधव, युवराज जाधव, पत्रकार विजय जाधव, माजी नगराध्यक्ष गणेश नारायणकर, माजी उपनगराध्यक्ष तथा नगरसेवक पठाण नय्युम भाई, शेख समीयोद्दिन, अँड. सय्यद वहाब, शेख सलीम पाशामियॉ, शेख जहीर, सादिक भाई नदाफ, पत्रकार शेख जावेद, पत्रकार विजय जाधव, पत्रकार शेख आजीज, सय्यद रियाज, पठाण लाला भाई, स.सज्जाद, शेख इम्रान नुर, शेख जव्वाद बिल्डर, शेख जमील, अतिक शहा, शेख इसहाक, सय्यद अनिस, शेख मोहसीन(भाऊ), तौसिफ खानसाहब, लाईक शहा, सय्यद सलीम, शेख युनुस, शेख निजाम, नजीर अहेमद कुरेशी, बशीर भाई, बाबुभाई सह इतरांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक पाटोदा सेवा सोसायटीचे संचालक सय्यद सज्जाद भाई यांनी केले. या वेळी बोलताना सय्यद सज्जाद यांनी रोजा व इफ्तार पार्टीचे महत्त्व सांगून रमजान ईद हा सण एकात्मतेचा संदेश देणारा सण आहे असे सांगितले. तर या वेळी आपले मनोगत व्यक्त करताना पोलीस निरीक्षक अनमोल केदार म्हणाले की हिंदू-मुस्लिम समाज बांधव आपण सर्व एकच आहोत आणि या एकतेचे प्रतीक म्हणून पोलीस स्टेशन तर्फे सर्व हिंदू-मुस्लीम बांधवांसाठी ईफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले आहे. या वेळी पाटोदा पोलीस स्टेशनचे सर्व पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या सह पाटोदा शहरातील बहुसंख्येने हिंदू-मुस्लिम समाज बांधव उपस्थित होते. आलेल्या सर्व मान्यवरांचे व नागरिकांचे गोपनीय शाखेचे पठाण रियाज यांनी आभार मानले.

# युगद्रष्टा सत्यशोधक डॉ.पंजाबराव देशमुख एक संग्राह्य पुस्तक

**लोकनेता न्युज नेटवर्क**

शिक्षण महर्षी , कृषी महर्षी डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांना लहानपणापासूनच शेतकऱ्यांविषयीची जाण होती, कळवळा होता कारण ते जन्माने आणि कर्माने भूमिपुत्र होते . शेतकऱ्यांच्या सहवासात त्यांचे बालपण गेले म्हणून त्यांना भारतीय शेती जगाच्या तुलनेत मागे असल्याची जाणीव होती. भारताचा विकास शेतीच्या विकासाशिवाय पूर्ण होऊ शकत नाही.हा त्यांचा विचार आजही तेवढाच मोलाचा आहे,त्यांनी तत्कालीन काळात शेतकऱ्यांसाठी राबवलेल्या योजना व धोरणे आज राबविल्या गेली तर एकाही शेतकऱ्यांची आत्महत्या न होता शेतकरी सुखी व समृद्ध होईल,असे अनेक पैलू

डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या जीवन संघर्षाचे आहेत.ते सर्व पैलू एकत्र करण्याचा प्रयत्न ज्या ग्रंथात प्रत्यक्ष करण्यात आला आहे त्या ग्रंथाचे नाव आहे

युगद्रष्टा सत्यशोधक
डॉ.पंजाबराव देशमुख

डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख संस्थापित श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित धनवटे नॅशनल कॉलेज,नागपूरचे प्रभारी प्राचार्य तथा संयोजक,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर अध्ययन केंद्र,वाणिज्य विभाग प्रमुख डॉ.पी.एस.चंगोले यांनी संपादित केलेला आणि मा.श्री हर्षवर्धनजी देशमुख ,अध्यक्ष श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती यांनी प्रकाशित केलेला युगद्रष्टा सत्यशोधक
डॉ.पंजाबराव देशमुख हा २५० पृष्ठसंख्या असलेला ग्रंथ वाचण्यात आला.भाऊसाहेबांच्या व्यक्तिमत्त्वातील विविध पैलूंचे दर्शन घडविणारा शिवसेवकांनीच नव्हे तर प्रत्येकाने संग्रही ठेवावा असा हा ग्रंथ मनाला स्पर्शून गेला म्हणून या ग्रंथाचा परिचय देण्याचा हा अल्पसा प्रयत्न.

डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांचे राष्ट्रीय योगदान नव्या पिढीला माहित व्हावे या उदात्त हेतूने धनवटे नॅशनल कॉलेजचे माजी प्राचार्य डॉ.बबनराव तायवाडे यांच्या मार्गदर्शनात दि.१० एप्रिल २००६ पासून डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती व्याख्यानमालांचे नियमितपणे आयोजन करण्याचा उपक्रम डॉ.बाबासाहेब आंबेडकर अध्ययन केंद्र आणि विज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू करण्यात आला . श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष ॲड. मा.अरुणभाऊ शेळके,मा.श्री वसंतरावजी धोत्रे तथा विद्यमान अध्यक्ष श्री हर्षवर्धनजी देशमुख यांच्या प्रोत्साहनामुळे हा उपक्रम आजही सुरू आहे.श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष मा.श्री वसंतरावजी धोत्रे यांनी या उपक्रमाच्या पहिल्या उद्घाटकीय भाषणाचे अध्यक्षस्थान भूषविले होते.या संयुक्त उपक्रमात विज्ञान महाविद्यालयाचे माजी प्राचार्य
डॉ.एन.एन.सास्ते व प्राचार्य डॉ. डी.के.बुरघाटे , प्रभारी प्राचार्य मा.पी.एस.चंगोले तथा प्राध्यापक व विद्यार्थी यांचाही उल्लेखनीय सहभाग राहिला आहे.दि.१० एप्रिल २००६ पासून दि.१० एप्रिल २०१७ पर्यंत एकूण १७ विचारवंतांची व्याख्याने आयोजित करण्यात आली होती.महाराष्ट्रासह विविध राज्यातील नामवंत,अभ्यासक, लेखक,विचारवंत यांना निमंत्रित करण्यात आले होते.त्यांनी भाऊसाहेबांवरील दिलेली भाषणे शब्दबद्ध होऊन ती ग्रंथरूपाने प्रकाशित व्हावी या उदात्त भावनेतून युगद्रष्टा सत्यशोधक डॉ.पंजाबराव देशमुख हे राष्ट्रजागृती ग्रंथमाला मधील तिसरे पुष्प साकारून दि.१० एप्रिल २०१८ रोजी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या ५३ व्या स्मृतिदिनानिमित्त धनवटे नॅशनल कॉलेज,नागपूर येथे श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष माननीय श्री दिलीप बाबू इंगोले आणि उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रकाशित झालेले आहे.

श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावतीचे विद्यमान अध्यक्ष व या ग्रंथाचे प्रकाशक मा.श्री हर्षवर्धनजी देशमुख यांनी

मान्यवर वक्त्यांच्या व्याख्यानातून साकार झालेला
' युगदृष्टा सत्यशोधक
डॉ.पंजाबराव देशमुख ' हा प्रेरणादायी व गतिमान शब्दरूप प्रवास आहे .असे आपल्या प्रकाशकीय मनोगत म्हटले आहे . तर या ग्रंथाचे संपादक प्रभारी प्राचार्य डॉ.पी.एस.चंगोले यांनी

युगद्रष्टा सत्यशोधक डॉ.पंजाबराव देशमुख या ग्रंथाद्वारे डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या जीवन संघर्षातील प्रकाश किरणे नव्या पिढीला अवश्य प्रकाशित करतील असा विश्वास वाटतो .असे आपल्या मनोगतात म्हटले आहे.

युगद्रष्टा सत्यशोधक डॉ.पंजाबराव देशमुख या ग्रंथांमध्ये एकूण सतरा प्रकरणातून सतरा मान्यवर विचारवंतांच्या डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या जीवन कार्य व व्यक्तिमत्त्वातील विविध पैलुंवर केलेल्या विषयावरील व्याख्यानांचे वस्तुनिष्ठ शब्दांकन करण्यासाठी श्री.भीमराव वैद्य,प्रा.प्रभाकर पावडे,श्री सुनील इंदू वामन ठाकरे आणि सौ.शीतल प्रशांत तांबे यांनी खूप मोलाचे योगदान दिलेले आहे.

पहिल्या प्रकरणात

डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या स्मृतिदिना निमित्त दि.१० एप्रिल २००६ ला डॉ.पंजाबराव देशमुख यांचा वैज्ञानिक दृष्टिकोन आणि बहुजन समाज या विषयावर रयत शिक्षण संस्था साताराचे अध्यक्ष प्रा.एन.डी. पाटील यांचे व्याख्यान शब्दबद्ध केलेले आहे. या व्याख्यानामध्ये प्रा.एन.डी.पाटील यांनी डॉ. पंजाबराव देशमुख यांचा वैज्ञानिक दृष्टिकोन बहुजन समाजाने आचरणात आणण्याचे प्रतिपादन केले.

समाज परिवर्तन चळवळीत डॉ.पंजाबराव देशमुख यांचे योगदान या विषयावर
डॉ.शशिकांत सावंत ,माजी प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख,विक्रम विद्यापीठ,उज्जैन मध्यप्रदेश यांचे व्याख्यान शब्दबद्ध केलेले आहे. या व्याख्यानामध्ये त्यांनी भाऊसाहेबांच्या समाज परिवर्तनाच्या कार्याचे अभ्यासपूर्ण



मूल्यमापन केलेलं आहे .

तिसऱ्या प्रकरणात

डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या स्मृतिदिना निमित्त दि.१० एप्रिल २००७ ला डॉ.पंजाबराव देशमुख यांनी केलेली धर्म चिकित्सा या विषयावर

डॉ.मधुकर वाकोडे ,माजी अधिष्ठाता कला विद्याशाखा,संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ यांनी डॉ.भाऊसाहेब हे धर्मचिकित्सक होते पण ७५ वर्ष या माणसाचं कार्य अंधारात ठेवण्याचं काम या देशातल्या बुद्धिजीवी वर्गाने केलेलं आहे . असे वास्तववादी विचार व्यक्त करून डॉ.पंजाबराव देशमुख यांनी केलेली धर्म चिकित्सा सविस्तरपणे सांगितलेली आहे. जी वाचकांनी अवश्य वाचलीच पाहिजे.

चौथ्या प्रकरणात

दि.१० एप्रिल २००८ ला

डॉ.पंजाबराव देशमुख यांचे समाज परिवर्तन चळवळीला गतिमान करण्यात राष्ट्रीय योगदान या विषयावर डॉ.रावसाहेब कसबे,डॉ.बाबासाहेबआंबेडकर अध्यासन ,पुणे विद्यापीठ,पुणे यांनी अभ्यासपूर्ण विचार मांडलेले आहेत.

पाचव्या प्रकरणात

दि.१० एप्रिल २००८ ला

डॉ.मनोज तायडे ,मराठी विभाग प्रमुख, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ ,अमरावती यांनी

डॉ.पंजाबराव देशमुख यांना अपेक्षित असलेले सांस्कृतिक परिवर्तन या विषयावरील मांडलेले विचार अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत.

सहाव्या प्रकरणात

दि.१० एप्रिल २००९ ला

डॉ.आनंद पाटील माजी प्रमुख व प्राध्यापक इंग्रजी विभाग,गोवा विद्यापीठ ,गोवा यांनी

डॉ.पंजाबराव यांचे राष्ट्रीय योगदान या विषयावर केलेल्या विचारांची मांडणी वाचनीय आहे .

सातव्या प्रकरणात

दि.१० एप्रिल २००९ ला

डॉ.पंजाबराव देशमुख आणि कर्मयोगी संत गाडगेबाबा,डॉ. बाबासाहेब आंबेडकर व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज या विषयावर प्रा.सुधाकरराव मोहोड , अर्थशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक , धनवटे नॅशनल कॉलेज,नागपूर यांनी व्याख्यानातून दोन संतांची व दोन थोर पुरुषांची वैचारिक भूमिका अतिशय स्पष्टपणे मांडलेली आहे.

आठव्या प्रकरणात दि .१० एप्रिल २०१० ला भारतीय समाज व्यवस्था परिवर्तनात डॉ.पंजाबराव देशमुख यांचे योगदान या विषयावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ,औरंगाबाद या विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.नागनाथ कोतापल्ले यांचे व्याख्यान तर
नवव्या प्रकरणात प्रा.हरि नरके , सल्लागार , नियोजन आयोग भारत सरकार नवी दिल्ली व विभाग प्रमुख महात्मा जोतीराव फुले अध्यासन,पुणे विद्यापीठ,पुणे यांचे भारताचे संविधान आणि डॉ.पंजाबराव देशमुख या विषयावर दिलेले अभ्यासपूर्ण व्याख्यान आहे .

दहाव्या प्रकरणात

दि .१० एप्रिल २०११ ला झालेल्या व्याख्यानमालेत महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री मा. श्री सुरेंद्र भुयार यांचे

डॉ.पंजाबराव देशमुख यांना अभिप्रेत असलेले सांस्कृतिक परिवर्तन या विषयावरील अभ्यासपूर्ण व्याख्यान दिलेले आहे .

अकराव्या प्रकरणात दि.१० एप्रिल २०११ ला झालेल्या व्याख्यानमालेत प्रा.प्रभाकर
पावडे ,उप -प्राचार्य ,पी.डब्ल्यू.
एस.कॉलेज,नागपूर यांचे डॉ . पंजाबराव देशमुख,डॉ.बाबासाहेब
आंबेडकर,संतश्रेष्ठ गाडगेबाबा आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना अभिप्रेत असलेले समाजप्रबोधन या विषयावरीलअ भ्यासपूर्ण व्याख्यान दिलेले आहे.

बाराव्या प्रकरणात दि.१० एप्रिल २०१२ ला झालेल्या व्याख्यानमालेत बळीराजा ते डॉ.पंजाबराव देशमुख या विषयावरील डॉ.आ.ह.साळुंखे सुप्रसिद्ध लेखक आणि विचारवंत,सातारा यांचे अभ्यासपूर्ण झालेले व्याख्यान शब्दबद्ध केलेले आहे.

तेराव्या प्रकरणामध्ये दि.१० एप्रिल २०१३ ला झालेल्या व्याख्यानमालेत डॉ.विठ्ठल वाघ, माजी प्राचार्य श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अकोला यांच्या डॉ.पंजाबराव देशमुख यांना अपेक्षित असलेले सांस्कृतिक परिवर्तन व हिंदू देवस्थान बिल या विषयावर अभ्यासपूर्ण झालेले व्याख्यान दिलेले आहे.

चौदाव्या प्रकरणात दि.१० एप्रिल २०१५ ला झालेल्या व्याख्यानमालेत भारतीय शेतकऱ्यांची दशा व दिशा तसेच वर्तमान कृषिधोरण आणि
डॉ.पंजाबराव देशमुख यांनी सुचविलेले उपाय या विषयावरील डॉ.आर.एस. देशपांडे ,माजी संचालक, इन्स्टिटट्यूट फॉर सोशल अँड इकॉनॉमिक चेंज, बंगलोर यांचे अभ्यासपूर्ण झालेले व्याख्यान दिलेले आहे.

पंधराव्या प्रकरणात दि.१० एप्रिल २०१५ ला झालेल्या व्याख्यानमालेत श्री चंद्रकांत वानखेडे ,माजी संपादक,दैनिक सकाळ ,विदर्भ आवृत्ती ,नागपूर यांचे संत गाडगेबाबा,राष्ट्रसंत तुकडोजी आणि डॉ.पंजाबराव देशमुख एकाच चळवळीचे साथीदार या विषयावर झालेले अभ्यासपूर्ण व्याख्यान दिलेले आहे.

सोळाव्या प्रकरणात दि.१० एप्रिल २०१६ ला झालेल्या व्याख्यानमालेत डॉ.पंजाबराव देशमुख यांचे कृषी ,शैक्षणिक व सामाजिक चळवळीतील योगदान या विषयावरील डॉ.साहेब खंदारे ,प्राचार्य ,माधवराव पाटील महाविद्यालय,पालम ,जि. परभणी यांचे झालेले अभ्यास पूर्ण व्याख्यान दिलेले आहे.

सतराव्या प्रकरणात दि.१० एप्रिल २०१७ ला झालेल्या व्याख्यानमालेत श्री प्रवीण गायकवाड,माजी प्रदेश अध्यक्ष, संभाजी ब्रिगेड,महाराष्ट्र राज्य,नेते - शेतकरी कामगार पक्ष ,महाराष्ट्र राज्य यांनी डॉ.पंजाबराव देशमुख आणि आरक्षण या विषयावर झालेले आभ्यासपूर्ण व्याख्यान दिलेले आहे.

या सतराही प्रकरणांमध्ये
डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या स्मृतिदिनानिमित्त झालेल्या कार्यक्रमांचे फोटो दिलेले असल्यामुळे शब्दबद्ध प्रत्येक व्याख्यान वाचताना वाचकांना जिवंतपणा वाटतो.इतकेच नव्हे तर येथे विचारवंत आपल्यासमोर व्याख्यान देत आहेत असे वाचकांना ते ते व्याख्यान वाचताना वाटल्याशिवाय राहत नाही इतका जिवंतपणा या व्याख्यानांमध्ये आहे.

युगद्रष्टा सत्यशोधक डॉ . पंजाबराव देशमुख या ग्रंथाच्या शेवटी डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या जीवनातील महत्त्वपूर्ण प्रसंगाचे चित्र सुद्धा प्रकाशित केलेले आहेत तसेच
डॉ. पंजाबराव देशमुख यांचा संक्षिप्त जीवनपट सुद्धा दिलेला आहे.

चित्रकार श्री प्रदीप पवार यांनी साकारलेले आकर्षक आणि अर्थपूर्ण मुखपृष्ठ आहे आणि
मलपृष्ठावर डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांचा कृषकांचा चौदा कलमी कार्यक्रम प्रकाशित केलेला आहे.डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या जीवन कार्यातील व व्यक्तिमत्त्वातील विविध पैलूंचे दर्शन घडविणारा युगद्रष्टा सत्यशोधक : डॉ.पंजाबराव देशमुख हा ग्रंथ म्हणजे प्रकाशक,संपादक आणि शब्दांकन करणारे मान्यवर यांनी केलेल्या परिश्रमाचे फळ होय.

**-प्रा.अरुण बाबारावजी बुंदेले,**
**माजी पर्यवेक्षक**
**नांदगाव हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय,नांदगाव खंडे.,जि. : अमरावती**

# संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील मराठी माणसाच्या रक्ताचे ठसे उद्धव ठाकरेंच्या हातालाही लागलेय-भाजपा अध्यक्ष आशिष शेलार

## जोगेश्वरी विधानसभेवर भाजपाचा झेंडा फडकविणार गटनेते आ. प्रविण दरेकरांनी व्यक्त केला विश्वास





**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**मुंबई (वृत्तसंस्था)**

संयुक्त महाराष्ट्र चळवळीत मराठी माणसाच्या छातीवर काँग्रेसच्या सरकारने गोळ्या घातल्या. त्या काँग्रेससोबत उद्धव ठाकरेंच्या पक्षाने हातमिळवणी केली. मराठी माणसाच्या खुणाच्या रक्ताने रंगलेला काँग्रेसचा हात उद्धव ठाकरेंनी हातात मिळवला आहे याचा अर्थ संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील मराठी माणसाच्या रक्ताचे ठसे उद्धव ठाकरेंच्या हातालाही लागलेय अशी खरमरीत टीका भाजपा मुंबई अध्यक्ष आशिष शेलार यांनी केली. तर आगामी निवडणुकीत जोगेश्वरी विधानसभेवर भाजपाचा झेंडा फडकविणार असल्याचा विश्वास गटनेते प्रविण दरेकर यांनी व्यक्त केला.

जोगेश्वरी-पूर्व येथील मनसेचे प्रदेश उपाध्यक्ष प्रविण मर्गज, विधानसभा अध्यक्ष बाबुभाई पिल्ले, दिगंबर मांजरेकर, मंगेश गुरव, रमाकांत नर, राजेंद्र महागावकर, संजय बने, विलास मेहकर, किशोर मुंडे, आकाश पाटील, अमोल पारधी, राजेश जाधव, कुणाल गावडे, अक्षता राणे, अमृता मोरे, कामिनी दळवी, उमा रमेंडकर, उर्मिला चव्हाण, पौर्णिमा भूमे, श्रद्धय सागवेकर, प्रतिभा ताम्हणकर, रेश्मा गोडके, मृणाली नाईक, दक्षा घोसाळकर, ज्योती गोसावी, मांडवकर ताई यांच्यासह जवळपास ६०० पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी आमदार आशिष शेलार आणि गटनेते प्रविण दरेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला. यावेळी ते बोलत होते.

यावेळी बोलताना दरेकर म्हणाले की, मी जेव्हा पक्ष सोडून भाजपात प्रवेश केला तेव्हा कधीही मनसे, राज ठाकरेंवर टीका केली नाही. हे सर्व कार्यकर्ते माझ्या तालमीत तयार झालेले आहेत. पण मी त्यांना कधीही भाजपात या असे म्हटले नाही. तुम्ही ज्या पक्षात आलात त्या पक्षात समाधान, आनंद मिळेल हा विश्वास देतो. मला विधनापरिषदेवर आमदार करा असे मी पक्षाच्या नेतृत्वाला कधीच म्हटले नाही. परंतु पक्षाने, नेतृत्वाने माझ्या कामाची दखल घेऊन आमदार, विरोधी पक्षनेता, गटनेता केले. ही पक्षाची सर्वसमावेशक भुमिका आहे. सर्व प्रथम राष्ट्रहित त्यानंतर पक्ष व नंतर स्वतः हा भाजपा आणि इतर पक्षातील फरक असल्याचे दरेकर म्हणाले. तसेच जोगेश्वरी विधानसभा क्षेत्रात जे एसआरएसह प्रलंबित प्रश्न आहेत ते निश्चित मार्गी लावू. आपले उत्तर मुंबईचे उमेदवार पियुष गोयल यांनी नानावटी, लिलावती, रिलायन्सच्या धर्तीवर उपनगरात सुसज्ज असे रुग्णालय उभारणार असल्याची ग्वाही दिल्याचेही दरेकरांनी सांगितले.

दरेकर पुढे म्हणाले की, राज्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली सरकार उत्तम कामं करत आहे. देवेंद्र फडणवीस यांच्यासारखे लोकप्रिय नेते नेतृत्व करताहेत त्यामुळे सर्व पक्षातील लोकांना भाजपात गेले पाहिजे असे वाटते. पंतप्रधान नरेंद्र मोदींविषयी वेगळा विश्वास जनतेत आहे. त्यामुळे पक्षाचे कार्य करा तुम्हाला मान, सन्मान देण्याचे निश्चितपणे कामं होईल. प्रविण मर्गज हे सहकारात माझ्यासोबत कामं करतात. त्यांनी महिलांसाठी किमान १० संस्था स्थापन कराव्यात. त्या संस्थांद्वारे रोजगार निर्माण करा, असे आवाहनही दरेकरांनी केले. तसेच आगामी निवडणुकीत जोगेश्वरी विधानसभेवर भाजपाचा झेंडा फडकल्याशिवाय राहणार नाही, असा विश्वासही दरेकरांनी व्यक्त केला.तर भाजपा मुंबई अध्यक्ष आ. आशिष शेलार म्हणाले की, उद्धव ठाकरे अब की बार भाजपा तडीपार अशी फुसकी जिकडे जातील तिकडे सोडताहेत. पण रविंद्र वायकर एकनाथ शिंदेच्या शिवसेनेत गेले, प्रविण मर्गज आमच्याकडे आले. म्हणजे जोगेश्वरीतून अब की बार उबाठा सेना तडीपार असे म्हणावे लागेल. भाजपा हा खऱ्या लोकशाही मूल्यांवर चालणारा सर्वसामान्य लोकांचा पक्ष आहे. हा कुणाचा पारिवारिक पक्ष नाही. या पक्षाचा मालक कार्यकर्ता आहे. कालपासून तुम्ही खासगी पक्षात होता आजपासून तुम्ही सार्वजनिक पक्षात आला आहात, असा टोलाही शेलार यांनी लगावला. शेलार पुढे म्हणाले की, भाजपा हा एकमेव राष्ट्रीय पक्ष असा आहे ज्याचा जन्म मुंबईत झाला. छत्रपती शिवाजी महाराजांना मानणारा पक्ष आहे. शिवाजी महाराजांच्या नावाने गळे काढायचे, घोषणा द्यायच्या, मतं मागायची याशिवाय उबाठा सेनेने काहीच केले नाही. आमच्या शिवरायांच्या आरामाराचे सैन्य व त्यांच्या पराक्रमाची अष्टमुद्रा ही भारतीय संरक्षण दलाच्या झेंड्यावर कुणी आणली असेल तर ती पंतप्रधान मोदींनी. आग्रा येथे शिवरायांचे राष्ट्रीय संग्रहालय हे तेथील भाजपाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी केले. उद्धव ठाकरे आणि त्यांच्या बगलबच्यानी २५ वर्ष मुंबईवर राज्य केले. त्यावेळी मुंबईला बाँबे म्हटले जायचे. संसदेत बाँबेचे मुंबई तत्कालीन भाजपा खासदार राम नाईक यांनी केल्याची आठवणही शेलार यांनी करून दिली.

आपला लढा महाविकास आघाडी आणि उद्धव ठाकरेंबरोबरच आहे. ही अभद्र युती महाविकास आघाडी आहे. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत मराठी माणसाच्या छातीवर काँग्रेसच्या मुरारजी देसाई, स. का. पाटील यांच्या सरकारने गोळ्या घातल्या. त्या काँग्रेससोबत उद्धव ठाकरेंच्या पक्षाने हातमिळवणी केली. मराठी माणसाच्या खुणाच्या रक्ताने रंगलेला काँग्रेसचा हात उद्धव ठाकरेंनी हातात मिळवला आहे याचा अर्थ संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील मराठी माणसाच्या रक्ताचे ठसे उद्धव ठाकरेंच्या हातालाही लागले असल्याचा घणाघात शेलार यांनी केला. पंतप्रधान मोदींचे स्वप्न भारताला विकसित करण्याचे आहे. तुमच्या सर्वांना उचित न्याय, सन्मान देणे ही माझी जबाबदारी आहे, असा विश्वासही शेलार यांनी दिला. याप्रसंगी जिल्हाध्यक्ष संतोष मेढेकर, उपजिल्हा अध्यक्ष दीपक खानविलकर, जोगेश्वरी-पूर्व विधानसभा निवडणूक प्रमुख उज्वला मोडक, मंडळ अध्यक्ष आनंद परब, माजी नगरसेवक मुरजी पटेल, सुभाष दरेकर आदी उपस्थित होते.

# ‘मेरे अंगने में तुम्हारा क्या काम है ?’ नांदेडच्या मतदारांचा आमदार अमित देशमुख यांना प्रतिप्रश्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । प्रतिनिधी**

नांदेड लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार वसंतराव चव्हाण यांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर गुरुद्वारा मैदानावर आयोजित केलेल्या सभेमध्ये माजी मंत्री व लातूरचे आमदार अमित देशमुख यांनी नांदेडच्या नेतृत्वावर चौफेर टीका केली होती. त्यांनी या जाहीर सभेमध्ये म्हटले की

’ मला नांदेडला प्रचार करण्यासाठी यावे लागेल असे कधी वाटले नव्हते. परंतु ’ तुमने पुकारा और हम चलें आये ’. यावेळी २०२४ ची लोकसभेची निवडणुक सामान्य माणसांनी हातात घेतली आहे. आणि सामान्य माणूस एखादी निवडणूक हातात जेंव्हा घेतो, तेंव्हा धनशक्तीचा निश्चित पराभव होतो. नांदेड येथील सामान्य मतदार महाविकास आघाडीच्या पाठीमागे खंबीरपणे उभा आहे. त्यामुळे निश्चितच मराठवाड्यांवर महाविकास आघाडीचा झेंडा फडकेल असा विश्वास त्यांनी या जाहीर सभेमध्ये व्यक्त केला होता. नांदेड आणि लातूर यांचे पिढ्यांपिढ्यांचे नाते आहे. कै. शंकरराव चव्हाण यांनी कै. विलासराव देशमुख यांना घडविले हा इतिहास आहे. थोडक्यात म्हणजे नांदेडने लातूरला घडविले असे सांगत अमित देशमुख यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. कालच्या काँग्रेसच्या प्रचार सभेमध्ये नांदेड जिल्ह्यातील ज्या राजकीय कार्यकर्त्यांचे राजकीय भविष्य माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांनी घडविले, त्यांनी अशोकराव यांना टार्गेट केले. काँग्रेसचे नेते आमदार अमित देशमुख हे अशोकराव चव्हाण यांच्यावर राजकीय टीका करतील हे अपेक्षितच होते. परंतु अशोकराव चव्हाण यांच्याकडे नजर रोखून बोलण्याचे धाडस नसलेल्या अनेक जणांनी त्यांच्यावर शाब्दिक प्रहार केले. अशोकराव चव्हाण यांच्याकडून राजकारणातील बाराखडी गिरवणार्यांनीच आपल्या गुरूला टार्गेट करून प्रचार सभेमध्ये सडकून टीका केली हा विषय नांदेडमध्ये चर्चेचा बनला आहे. या प्रचार सभेमध्ये भाजपाचे उमेदवार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्यापेक्षा खा. अशोकराव चव्हाण यांच्यावरच काँग्रेसच्या मंडळीचा रोष अधिक दिसून आला. अशोकराव चव्हाण यांचा नामोल्लेख न करता 'अशोकाच्या पानगळती नंतर वसंत ऋतुची बहार येते.' असे त्यांनी नमूद करताच उपस्थित त्यांनी चांगलीच दाद दिली.





मराठवाडा ही क्रांतिकारकांची भूमी आहे. मराठवाड्यातील जनतेने विशेषतः नांदेड मधील क्रांतिकारकांनी मुघल, औरंगजेब निजामाविरुद्ध संघर्ष करून लढण्याची गौरवशाली परंपरा आजही अबाधित ठेवल्याचे त्यांनी गौरवाने सांगितले. या वाक्याचा रोख नेमका कोणाकडे होता याबद्दलही नांदेडमध्ये राजकीय चर्चा या निमित्ताने चालू झाली आहे. महाराष्ट्रात हुकूमशाही पद्धतीने राज्यकारभार केला जात असून विरोधकांना संपविण्याचे काम राज्यकर्ते करत असल्याचाही त्यांनी आरोप केला. या जाहीर सभेला आमदार अमित देशमुख वगळता काँग्रेसचा प्रदेश स्तरावरचा एकही नेता उपस्थित नव्हता परंतु कोणताही मोठा नेता उपस्थित नसल्याची उणीव आ.अमित देशमुख यांनी भरून काढली.स्व. विलासराव देशमुख यांच्या खास भाषणशैलीची आठवण यावेळी आमदार अमित देशमुख यांच्या भाषणाच्या निमित्ताने नांदेडकरांना आली. स्व. विलासराव देशमुख यांनीच प्रतापराव पाटील चिखलीकर यांचे नेतृत्व घडविल्याचे व त्यांना ताकद देण्याचे काम केले होते बहुधा याची आठवण त्यांच्या पुत्राला झाली नाही. अशीही चर्चा ही सभा पार पडल्यानंतर नांदेडमध्ये झाली. लातूर लोकसभा मतदारसंघांमध्ये २०१९ च्या निवडणुकीमध्ये भारतीय जनता पक्षाच्या उमेदवार निवडून आल्यानंतर लातूर जिल्ह्यात भाजपाची ताकद कमालीची वाढलेली आहे. अलीकडेच लोकसभेचे माजी अध्यक्ष शिवराज पाटील चाकूरकर यांच्या स्नुषा अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी भाजपामध्ये प्रवेश केला आहे. तसेच उमरग्याचे माजी आमदार बसवराज पाटील यांनीही भाजपामध्ये प्रवेश केल्यामुळे या मतदारसंघांमध्ये भाजपाच्या विजयाची घोडदौड याही वेळी यशस्वी मानली जात आहे. लातूरकडे लक्ष द्यायचे सोडून आमदार अमित देशमुख यांनी नांदेड लोकसभेमध्ये लक्ष कोणत्या कारणावरून घातले आहे. हे सर्वांनाच ठाऊक आहे. मेरे अंगने में तुम्हारा क्या काम है ? ’ या शब्दांमध्ये नांदेडच्या मतदारांनी आमदार अमित देशमुख यांना प्रतिप्रश्न या निमित्ताने केला आहे.अशोकराव चव्हाण यांनी भाजपात प्रवेश केल्यानंतर नांदेड जिल्ह्यातील काँग्रेस संपुष्टात आली असे म्हणणाऱ्यांना कालच्या नांदेड मधील गर्दीने चांगलीच चपराक दिली आहे. हजारोंचा जनसमुदाय उस्फूर्त काँग्रेसचे उमेदवार वसंतराव चव्हाण यांच्या उमेदवारी अर्ज भरण्यासाठी उपस्थित होता. भाजपाला ही लढत सुरुवातीला सोपी वाटत होती परंतु काँग्रेसच्या रॅलीमधील गर्दीचा उच्चांक पाहता निश्चितच ही लढत तुल्यबळ होणार आहे असे राजकीय संकेत मिळत आहेत. कालच्या काँग्रेसच्या रॅलीमध्ये सर्वसामान्य नागरिक व ग्रामीण भागातील युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राणीवाहेगावच्या जि.प. शाळेला १११ पुस्तकांची भेट

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**परतूर । प्रतिनिधी**

राणीवाहेगाव (ता.परतूर) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील वाचनालयाला परभणी येथील एचएआरसी संस्थेतर्फे एकशे अकरा पुस्तकांची आनंदी वाचन पेटी भेट देण्यात आली. एचएआरसी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी राणीवाहेगाव शाळेतील वाचनालयाला भेट दिली.त्या प्रसंगी विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर तयार केलेल्या चिकट बुकांचे त्यांनी कौतुक केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अक्षर आनंद वाचन संस्कार चळवळीचे परभणी जिल्हा समन्वयक प्रकाश डुबे यांनी केले. यावेळी त्यांनी अक्षर आनंद पचन संस्कार केंद्र राबवीत असलेल्या पाच कलमी कार्यक्रमाबद्दल माहिती दिली, तसेच अक्षर आनंद ई-बाल मासिकासाठी साहित्य पाठविण्याचे आवाहन त्यांनी केले.एचएआरसी संस्थेचे ध्येय व कार्याविषयी माहिती संस्थेचे अध्यक्ष डॉ.पवन चांडक यांनी दिली. ड.चंद्रकांत राजूरे व राजेंद्र खापरे व राऊतवाड यांनी मुलांना वाचनाचे महत्व सांगितले. आणि शाळेतील विद्यार्थी कु.हर्षदा वाव्हळ, आरती आकात, हर्ष मानवतकर, भाग्यश्री आकात, रूद्र मानवतकर, शिवाणी कळसाईतकर, शैलेश बोबडे यांनी वाचलेल्या पुस्तकावर विवेचन केले.




शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती नरसाबाई करवा यांनी आभार मानले या कार्यक्रमास पालक वर्ग म्हणून रमेश मानवतकर,धिरज वाव्हळ, राधाकिसन बोबडे, विष्णू मखमले, अरविंद सराफ,श्याम यादव ,सचिन वाव्हळ, हरीभाऊ खंदारे यांची उपस्थिती होती.शाळेच्या शिक्षिका अनिता तांगडे व कल्पना वानरे मॅडम यांनी कार्यक्रमास सहकार्य केले.

# कौसडी येथे इफ्तार पार्टीच्या माध्यमातून एकतेचा संदेश

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कौसडी । प्रतिनिधी**

जिंतूर तालुक्यातील कौसडी येथील माजी सरपंच शेख सलीम यांच्या निवासस्थान परिसरात दिनांक ७ एप्रिल रविवार रोजी इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. या इफ्तार पार्टीच्या माध्यमातून हिंदू मुस्लिम एकतेचा संदेश देण्यात आला.



सध्या मुस्लिम बांधवांचा पवित्र रमजान महिना हे अंतिम टप्प्यात आला असून या रमजान महिन्यामध्ये मुस्लिम बांधव रोजा (उपवास) ठेवतात तसेच अल्लाहाची प्रार्थना करतात व कुराआण ग्रंथाची पठण करतात. मुस्लिम समाजातील नागरिक महिला लहान मुले तप-तपत्या उन्हात १३ ते १४ तास रोजा (उपवास) ठेवून महिनाभर अल्लाह ईश्वराची प्रार्थना करत असतात. माजी सरपंच शेख सलीम यांनी आयोजित केलेल्या इफ्तार पार्टीमध्ये प्रमुख उपस्थिती म्हणून विक्की बोर्डीकर हे होते तर माजी सरपंच यशवंतराव देशमुख माजी पं.स.सदस्य आयुब खान पठाण माजी सरपंच लिंबाजीराव इखे माझी चेअरमन तातेराव बारवकर रघुनाथ कळासने, चंद्रकांत कुलकर्णी कोक चे सरपंच वहीद खान पठाण मंचकराव देशमुख, हरिभाऊ खैरे ग्रा.पं.सदस्य बालासाहेब बहिरट माऊली बारवकर, शिवाजी लगड, दत्ता काळे, समीर पठाण, अन्वर पटेल यांच्यासह हिंदू मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते हे इफ्तार पार्टी यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी शेख तज्जमुल, शेख जुनेद, शेख समीर, शेख मसरूफ, शेख रहीम, शेख फारुख, यांनी परिश्रम घेतले होते.

# बैल जोडी पळवणाऱ्या चोरट्यास पोलिसांनी पकडले



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**परभणी । प्रतिनिधी**

०५ एप्रिल रोजी सायंकाळी ६.३० ते ८.०० सुमारास चिकलठाणा परिसरातील शेतकरी हकीम खान आशरफ खान पठाण यांच्या शेतातील हरण्या रंगाचे बैल जोडी अंदाजे किंमत ७० हजार रुपये असणारी शेतीतील आखाड्यावर बांधले व जेवण करण्यासाठी घरी निघून गेले व त्यानंतर थोड्या वेळाने बैलांना वैरण टाकण्यासाठी शेतीतील आखाड्यावर आले असता तिथे बैल जोडी दिसला नाही म्हणून त्यांनी त्यांच्या नातेवाईकास व पोलिसात फोन करून आजूबाजूच्या परिसरात शोध घेतला असता खूपसा पाठीच्या जवळ रोडवर साईबाबा मंदिराच्या बाजूस परमेश्वर लक्ष्मण शिंदे राहणार देवला पुनर्वसन अशा व्यक्तीला बैलजोडी घेऊन जात असता पोलीस उपनिरीक्षक देशमुख आणि पोलीस हवालदार सूर्यवंशी व कांगणे यांनी ताब्यात घेतले पोलीस निरीक्षक बोरसे साहेबांच्या आदेशानुसार सदरील व्यक्तीवर गुन्हा दाखल करून पुढील तपास पोलीस हवालदार सूर्यवंशी यांच्याकडे देण्यात आला आहे..

# भाई विष्णुपंत घोलप म्हणजे प्रेम व सौहार्दपूर्ण पुरोगामी विचारांची शिदोरी-अँड.सय्यद वहाब

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**

पुरोगामी विचारधारेची पताका खांद्यावर घेऊन शेतकरी, कामगार तसेच तळागाळातील सामान्य माणसाच्या न्याय, हक्कासाठी लढा देत वेळ पडली तर स्वत:चे रक्त सांडण्यासाठी मागे न हटणारे भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे बीड जिल्हा चिटणीस भाई विष्णुपंत घोलप यांचे कार्य म्हणजे जाती पाती साठी नाही तर माणुसकी टिकली पाहिजे व सर्व सामान्याचे प्रश्न सुटले पाहिजे, असे राहीले असुन कोणताही राजकीय लोभ न ठेवता दरवर्षी मुस्लिम बांधवांना पवित्र माहे रमजान महिन्यात इफ्तार पार्टीच्या माध्यमातून प्रेम व सौहार्दपूर्ण पुरोगामी विचारांची शिदोरी न चुकता देतात असे




प्रतिपादन माजी सरपंच अँड सय्यद वहाब यांनी केले आहे. दिनांक ७ एप्रिल २०२४ रविवार रोजी भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे बीड जिल्हा चिटणीस भाई विष्णुपंत घोलप यांनी आयोजित केलेल्या इफ्तार पार्टी प्रसंगी अँड.सय्यद वहाब बोलत होते. भाई विष्णुपंत घोलप यांच्या वतीने मुस्लिम बांधवांना प्रत्येक वर्षी अविरतपणे इफ्तार पार्टी दिली जाते. या वर्षी ही देण्यात आली. सर्व प्रथम भाई विष्णुपंत घोलप यांचे मुस्लिम समाजाच्या वतीने स्वागत करण्यात आले. त्या नंतर हिन्दू-मुस्लिम समाज बांधवांनी एकत्रित पवित्र माहे रमजानचा रोजा(उपवास) सोडला व अल्पोपहाराचा आनंद घेतला. या वेळी जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते दलितमित्र एकबाल पेंटर, कॉ.महादेव नागरगोजे, शिवभुषन जाधव, राहुल जाधव, अबलुक घुगे, स्वामी सानप, गणेश कवडे, राजेंद्र जायभाय, नगरसेवक पठाण नय्युम भाई, माजी सरपंच ड.सय्यद वहाब, जव्वाद भाई, शेख इम्रान नुर, सय्यद सज्जाद, पत्रकार विजय जाधव, पत्रकार जावेद शेख, पत्रकार हमीदखान पठाण, पत्रकार हरिदास शेलार, विष्णुपंत गाडेकर (फौजी), बाबासाहेब अडागळे, रविंद्र कांबळे, बाबा तनपुरे, दिपक घोलप, शेख बाबर, नासेर भाई, रामदास भाकरे यांच्या सह आदी मान्यवर उपस्थित होते. या वेळी मुस्लिम समाजाच्या वतीने सय्यद सज्जाद यांनी आभार मानले. तर भाई विष्णुपंत घोलप यांनी सर्व मुस्लिम बांधवांना रमजान महिन्याच्या व येणाऱ्या रमजान ईदच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी इफ्तार पार्टी साठी पाटोदा शहर व परीसरातील हिंदू-मुस्लिम समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पंकजाताई मुंडेंना लोकसभेत पाठविण्यासाठी पालकमंत्री, आमदारांच्या गावोगावी बैठका

## स्थानिक नेते, कार्यकर्ते लागले कामाला;सुक्ष्म प्रचार यंत्रणा राबवून विक्रमी मताधिक्य देण्याचा निर्धार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणूकीसाठी येत्या १३ मे रोजी मतदान होत आहे. तब्बल २१ लाख १५ हजारे ८१३ इतके मतदान असलेल्या बीड जिल्ह्यात भाजपाच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांना भाजप महायुतीने बीड लोकसभेची उमेदवारी दिल्यानंतर पालकमंत्र्यांसह भाजप महायुतीचे सर्व आमदार, माजी आमदार, जिल्हाध्यक्ष आदी नेत्यांसह महायुतीचे तालुका व गावपातळीवर काम करणारे पदाधिकारी, कार्यकर्ते जोमाने कामाला लागले आहेत. पंकजाताईंना विक्रमी मतांनी निवडून देत लोकसभेत मान-सन्मानाने पाठवण्याचा निर्धार सर्व जण विविध ठिकाणी बोलून दाखवत आहेत.

सध्या पंकजाताई मुंडे यांनी नुकताच प्रचाराचा पहिला टप्पा पूर्ण करून दुसरा टप्पा सुरू केला आहे. गावोगावी महायुतीचे कार्यकर्ते तसेच पालकमंत्री धनंजय मुंडे यांचेसह आमदार सुरेश धस, आ. प्रकाश सोळंके, आ. लक्ष्मण पवार, आ. बाळासाहेब आजबे, आ. नमिता मुंदडा, माजी आमदार केशवराव आधळे, भीमराव धोंडे, अमरसिंह पंडित, जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के तसेच शिवसेनेचे जिल्हाप्रमुखांसह नेते मंडळी पंकजाताईंच्या प्रचारार्थ आपल्या बुथ पातळीवर अधिकाधिक मतदान मिळवून देण्यासाठी पायाला भिंगरी लावून फिरत आहेत.यापूर्वी राज्य मंत्रीमंडळात स्वत:ची छाप पाडणारे काम करत जनमानसात दिवगंत लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांचे विचार कायम ठेवणार्या पंकजाताई मुंडे यांच्याबद्दल जिल्ह्यातील भाजप-महायुतीच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांबद्दल प्रचंड आदरभाव आहे. आता लोकसभा निवडणूकीच्या निमित्ताने पंकजाताईंना मोठ्या मताधिक्क्यांनी निवडून आणायचेच, असा निर्धार महायुतीचे कार्यकर्ते करु लागले आहेत. प्रत्येकाने आप-आपला बुथ सांभाळायचा, अन् अधिकाधिक मतदारांपर्यंत पोहचून महायुतीची विचारधारा त्यांच्यापर्यंत पोहचवायची असे नियोजन सर्व बुथप्रमुख करु लागले असून आगामी एक महिन्यात कटाक्षाने प्रचारयंत्रणा सक्षम ठेवतानाच नवीन आणि यंदा पहिल्यांदाच मतदान करणार्या मतदारांपर्यंत संपर्क साधून भाजप-महायुतीचे कार्यकर्ते ‘मोदी सरकार’ची कार्यप्रणाली आणि धोरणे त्यांच्यापर्यंत पोहचवण्याचे काम करण्यास सज्ज झाली आहे.

याबरोबरच मागील दहा वर्षात केद्रांतील भाजप-एनडीए सरकारने गोरगरिब, वंचित, उपेक्षित कष्टकरी, कामगार यांच्यासाठी राबवलेल्या विविध योजना अन् त्यातून लाभ मिळालेल्या नागरिकांची भावना किती चांगली आहे, याबाबतचे सुक्ष्म नियोजन करत महायुतीचे सर्व कार्यकर्ते गावोगावी सरकारचे हे काम मतदारांपर्यंत पोहचवत आहेत. पंकजाताईंना विक्रमी मतांनी निवडून देत केंद्रात पुन्हा एकदा देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना ‘अब की बार ४०० सो पार’ चा नारा देतांना दिसत आहेत. गाव-वाडी-वस्ती-तांड्यापर्यत पोहचून पंकजाताईंना मतदान करण्याचे आवाहन कार्यकर्ते करत आहेत.



# धर्माबादेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती, रमजान ईद, श्रीराम नवमी निमित्ताने संयुक्त शांतता बैठक शांततेत पडली पार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**धर्माबाद । साहेबराव दुगाने**

धर्माबाद - एप्रिल महिन्यात अवघ्या काही काही दिवसातच डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, रमजान ईद, श्रीराम नवमी हे तिन मोठे सण याच महिन्यात येत असल्याने व सध्या सार्वत्रिक लोकसभा निवडणुका पार्श्वभूमीवर देशात व राज्यात आदर्श आचारसंहिता सुरू आहे आचारसंहितेचे कठोर पालन होण्यासाठी धर्माबाद नगरपालिका, पोलीस प्रशासन, क्शन मोडवर आली आहे. त्यातच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती १४ एप्रिल रोजी आहे धर्माबादेत जयंती दरवर्षी भीम आणि अनुयायींच्या वतीने जयंती मोठ्या हर्ष उल्हासात साजरी करण्यात येते दरवर्षी एक एप्रिल पासूनच युवक वर्गातुन मोठ्या प्रमाणात जयंतीच्या तयारीची लगबग सुरू असते संपूर्ण शहर निळमय वातावरण करण्यात येते मात्र यंदा आचारसंहितेमुळे राजकीय नेत्याचे होल्डिंग न लावणे, झेंडे न लावणे वेळेचे निर्बंध लावण्यात आले प्रशासनाला प्रशासनाचे जे काही नियम सर्वांच्या समोर मांडता यावं म्हणून आज धर्माबाद नगरपालिका सभागृहात धर्माबाद पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अभिषेक शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली शांतता बैठकीचे आयोजन करण्यात आले होते या बैठकीस प्रमुख पाहुणे म्हणून धर्माबाद नगरपालिकेचे मुख्याधिकारी सतीश पुदाके, विद्युत अभियंता रवी धोते सार्वजनिक विभागाच्या राणीताई कांबळे ह्या होत्या धर्माबाद शहर हे अतिशय शांतताप्रिय गाव असून याची नांदेड जिल्ह्यासह महाराष्ट्रात धर्माबाद चे शांतताप्रिय चांगले मोठे नाव आहे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती, रमजान ईद, श्रीराम नवमी हे शांततेत तसेच जातीय व धार्मिक सलोखा राखून पार पाडण्यासाठी धर्माबाद शहरातील नागरिकांनी योग्य ते काळजी घ्यावी



तसेच एकमेकांच्या धार्मिक भावना दुखावणार नाही असा मजकूर (स्टेटस) सोशल मीडियावर वायरल करू नये याची दक्षता घेण्याचे आवाहन धर्माबाद पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अभिषेक शिंदे यांनी केले जर कोणी असा अनुचित प्रकार घडला स्टेटस असं काही ठेवल्यास आम्हाला कळल्यास आम्ही त्यांच्यावर योग्य ते कठोर कारवाई करू असेही ते म्हणाले. तिन सण एकत्र येत असल्यामुळे सार्वजनिक सण साजरे होणार असून दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये तसेच समाजात तेढ निर्माण होणार नाही व कोणाच्याही धार्मिक भावना दुखावणार नाही याबाबत नागरिकांनी अधिकाधिक दक्षता घ्यावी. जरी आपल्या कोणास होर्डिंग लावायची असल्यास नगरपालिका ची परवानगी घेऊनच होर्डिंग लावावे असेही नगर परिषद प्रशासनाच्या वतीने मुख्याधिकारी सतीश पुदाके यांच्या वतीने आवाहन करण्यात आले. बैठकीत जयंती मंडळाच्या ज्या काही अडचणी आहेत त्या त्या विभागाच्या अधिका-यांकडे कार्यकर्त्यांनी मांडल्या व अधिकारी वर्गांनी त्यांच्या मांडलेल्या अडचणी ची नोंद घेऊन काही दिवसातच त्यांच्या सर्व अडचणी ची व्यवस्था करू असे आश्वासन दिले. यावेळी धर्माबाद शहरातील सर्वच प्रभागातील जयंती मंडळाचे अध्यक्ष पदाधिकारी, ज्येष्ठ नागरिक अनेक पक्षाचे पदाधिकारी पत्रकार युवक वर्ग उपस्थित होते.

## महाराष्ट्रात सर्वप्रथम आल्याबद्दल कु.भक्ती सिद्धेश्वर पटणे हिचा क्रीडा व युवक कल्याण मंत्री मा.संजयजी बनसोडे यांच्या हस्ते सत्कार संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सुनिल बस्वराज हावा । उदगीर**

उदगीर पुणे येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय स्कुल संसद स्पर्धेत महाराष्ट्रातून निवडक ५० शाळेतून आलेल्या विद्यार्थ्यांमधून तीन दिवस चाललेल्या विविध स्पर्धेत कु. भक्ती सिद्धेश्वर पटणे हिने प्रथम क्रमांक पटकावला आहे. त्याच बरोबर रंगकर्मी प्रतिष्ठानच्या वतीने घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय निबंध स्पर्धेतही महाराष्ट्रात सर्वप्रथम क्रमांक पटकवला आहे तिच्या या दुहेरी यशाबद्दल व तीने उदगीरचे नाव महाराष्ट्रभर गाजवल्याबद्दल इच्छापूर्ती कोचिंग क्लासेसचे संचालक प्रा.सिद्धेश्वर पटणे यांची कन्या कु.भक्ती हिचा विकासपुरुष क्रीडा व युवक कल्याण मंत्री मा.संजय बनसोडे साहेब यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला यावेळी खासदार मा.सुधाकरराव शृंगारे, माजी आमदार मा.गोविंदआण्णा केंद्रे, माजी आमदार मा.सुधाकरराव भालेराव, माजी जि.प.अध्यक्ष मा.राहुलभैय्या केंद्रे, माजी जि.प.उपाध्यक्ष



मा.रामभाऊ तिरुके, भाजपचे शहराध्यक्ष मा.मनोज पुदाले, माजी जि.प.सदस्य मा.बापूरावजी राठोड, मा.प्रा.पंडित सूर्यवंशी, भाजपा युवा मोर्चाचे जिल्हा अध्यक्ष अमोल निडवदे, मा.उमाकांत सिद्धेश्वरे, मा.व्यंकटेश संगूळगे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. त्याचबरोबर लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून ओळखले जाणारे सर्व पत्रकार बांधव उपस्थित होते त्यात प्रामुख्याने ज्येष्ठ पत्रकार मा.युवराज धोत्रे, मा.व्ही.एस. कुलकर्णी, मा.श्रीनिवास सोनी, मा.अर्जुन जाधव, मा.मनोहर लोहारे, मा.महादेव घोणे, मा.सिद्धार्थ सूर्यवंशी, मा.बिभीषन मद्देवाड, मा.संदीप निडवदे, मा.भगवान सगर, मा.विश्वनाथ गायकवाड, मा.महादेव अनवले, मा.अनिल जाधव इत्यादी उपस्थित होते.इत्यादी मान्यवरांच्या उपस्थित मा.युवराज धोत्रे यांनी हा सत्कार आयोजित केला होता. कु.भक्तीच्या या राज्यस्तरीय दुहेरी यशाबद्दल सर्व स्तरातून तिच्यावर अभिनंदनाचा व कौतुचा वर्षाव होत आहे.

## राज्य सरकारने केलेली विज दरवाढ तात्काळ रद्द करा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

राज्य सरकारने केलेली विज दरवाढ तात्काळ रद्द करण्यात यावी,अशी मागणी शिवसेनेचे तालुकाप्रमुख परमेश्वर जाधव यांनी उपविभागीय अधिकाऱ्यांकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

उपविभागीय अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात असे नमूद केले की,शेतकऱ्यांच्या मालाला भाव व मजुरांच्या हाताला काम नसल्यामुळे आणि केंद्र सरकारने अच्छे दिनचे स्वप्न दाखवून केलेल्या माहागाईमुळे सर्वसामान्य जनता होरपळत आसताना राज्य सरकारने १० टक्के विज दरवाढ करून गोरगरिब जनतेच्या खिशाला कातरी लावण्याचे काम केल्याने हे शिंदे सरकार जनतेचे नसून भ्रष्ट पुढारी व भांडवलदार धारजनी आहे हे स्पष्ट होत आहे.

एकीकडे पंतप्रधान प्रत्येक सभेत पंतप्रधान सुर्योदय योजनेचे गोडवे गाऊन सर्वसामान्य जनतेचे विज बिल कसे शुन्य होईल असे खोटे स्वप्न दाखवत आहेत.आणि दुसरीकडे त्यांच्याच इशाऱ्यावर चालणारे शिंदे सरकार यांनी आणिबाणी लागल्या सारखी दि.१ एप्रिल २०२४ पासून विज दरवाढ करून जनतेचा छळ करण्याचा पराक्रम केला आहे. त्यामुळे विज दरवाढ तात्काळ रद्द करुन जनतेला न्याय द्यावा. अन्यथा शिवसेनेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा शिवसेनेचे तालुकाप्रमुख परमेश्वर जाधव यांनी उपविभागीय अधिकाऱ्यांकडे लेखी निवेदनाद्वारे दिला आहे.



निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री,ऊर्जामंत्री, जिल्हाधिकारी यांना देण्यात आल्या आहेत.

या निवेदनावर शिवसेनेचे तालुकाप्रमुख परमेश्वर जाधव, विधानसभा संघटक गणेश कुंटेवार,तालुका संघटक माजी सभापती पंडितराव देवकांबळे,तालुका समन्वयक तथा माजी पं.स.सदस्य उत्तम चव्हाण,किसान सेनेचे तालुकाप्रमुख शिवाजी कदम, चेअरमन एम.एम.पवळे जळबा शिंदे,जगन्नाथ जाधव,अच्युत मेटकर,बालाजी बस्वदे,गंगाधर कळकेकर आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## पद्मावती धरणात अत्यल्प जल साटा पाणी जपून वापरान्याचे ग्रामपंचायतचे गावाकऱ्यांना आव्हान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**वालसावंगी । कौतिक हिवाळे**

वालसावंगीसह भोकरदन तालुक्यात गेल्या पावसाळ्यात जेम- तेम पाऊस झाला त्यामुळे तालुक्यातील सर्वच धरणांनी जानेवारी महिन्यातच तळ गाठले होतं.

त्यामुळे तालुक्यातील बहुतांश गावाला पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे.पद्मावती येथील धरणात मोजकच जलसाठा शिल्लक आहे. आणि या धरणातून परिसरातील अनेक गावांना पाणी पुरवठा केला जातो. म्हणून येथील नागरिकांना ग्रामपंचायत तर्फ येथील पाणी जपून वापरण्याचे आव्हान करण्यात येत आहे.



सद्या भोकरदन तालुक्यात भीषण पाणी टंचाई निर्मान झाली आहे. आपल्या गावालाही पाणी त्यांचाईच्या झळा बसायला सुरवात झाली आहे कृपया नागरिकांनी पाणी जपून पावरावे
–अर्चनाताई वाघ सरपंच वालसावंगी

## मलकापूर तालुक्यात अवकाळी पावसाची हजेरी नागरिकांना मिळाला गारवा


■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अनिलकुमार गोठी । मलकापूर**

मलकापूर ९/४/२४ शहरात विजेच्यात कडकराट यासह अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने उकाड्यापासून नागरिकांना थोडासा गारवा मिळाला आहे.

तर हवामान खात्याने तीन-चार दिवस पावसाचा अंदाज वर्तविल्याने आज दि.९ ला मलकापूर शहरात चारच्या सुमारास रिमझिम पावसाच्या सरी विजेच्या करक्रात सह चांगल्यास बसल्याने चिमूरड्यांनी पावसाचा मनसोक्त आनंद घेतला तर नागरिकांना उकाळ्यापासून थोडासा गारवा मिळाला आहे.

एप्रिल महिन्याला सुरुवात होत नाही तर तापमानाने दिवसं दिवस उच्चांक गाठत असताना मलकापूर शहराचे तापमान ४० सेल्सिअस पर्यंत तापमान पोहोचले आहे त्यातच हवामान खात्याने पावसाचा अंदाज वर्तविल्याने आज दि. ९ एप्रिल रोजी गुढीपाडव्याच्या मराठी नवीन वर्षाच्या सुरुवातीलाच पावसाने हजेरी लावल्याने एक वेगळाच पावसाचा थंड गार वारा नागरिकांनी अनुभवला आहे.



## आष्टी तालुक्यात पुन: एक कौतुकाची थाप! श्रीमती पुष्पा रविंद्र खाकाळ यांना "आदर्श सरपंच" पुरस्काराने सन्मानित

### महिला हीच गावच्या विकासाची ताकद..

भारतीय संस्कृतीमध्ये महिलाही लक्ष्मी रुपात पाहिलं जाते आष्टी तालुक्यातील शेरी बु गावच्या सरपंच पदी एका सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील पुष्पाताई खाकाळ यांना सलग पंधरा वर्षे बिनविरोध काम करण्याची संधी मिळाली त्यानंतर खऱ्या अर्थाने गावच्या विकासाला गती आली. अनेक शासकीय योजना त्यांनी आपल्या गावामध्ये राबवल्या ग्रामीण विकासाला खऱ्या अर्थाने त्यांनी चालना दिली आहे शेरी बु. ग्राम विकासाची चळवळ उभी करून सरपंच म्हणून पुष्पाताई खऱ्या अर्थाने महिला ही ग्राम विकासाची ताकद आहे हे लक्षात येते.पुढील काळात सुद्धा आपल्या गावाला नक्कीच विकासाच्या दिशेने घेऊन जातील आणि देशाच्या व जगाच्या नकाशावर पोहोचवतील यात तीळ मात्र शंका नाही.

**सौ.उज्वला दिपक सोनवणे**
**सचिव:- इरा बचत शेरी बु!**



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । राजू म्हस्के**

दैनिक राज्य लोकतंत्रच्या द्वितीय वर्धापन दिनानिमित्ताचे औचित्य साधून दैनंदिन जीवनात विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी करून आपल्या कार्यकर्तृत्वाच्या जोरावर आपल्या भागाचे, तालुक्याचे व जिल्ह्याची पोहचवून कार्य करणाऱ्या शेरी बु! च्या सरपंच श्रीमती पुष्पाताई खाकाळ यांना आदर्श सरपंच पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. हा पुरस्कार वितरण सोहळा दिनांक ८ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता बीड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात पार पडला यावेळी आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे प्रमुख डॉ. ओमप्रकाश शेटे, पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त एस. एम. देशमुख, सामाजिक कार्यकर्ते गौतम खटोड, इन्फंट इंडियाचे संचालक दत्तामामा बारगजे आणि पसायदान सेवा प्रकल्पचे संचालक गोवर्धन दराडे या मान्यवरांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण करण्यात आला. यावेळी राहुल गोरे, शिवाजी डोरले, स्वाती गोरे, आदित्य खाकाळ, माधुरी खाकाळ,ऋतूजा खाकाळ आदी उपस्थित होते.

### आदर्श सरपंच म्हणून अभिमान व कौतुक

गावच्या विकासाचा चेहरा मोहरा सरपंच श्रीमती पुष्पा ताई खाकाळ यांनी सलग १५ वर्षे बिनविरोध सरपंच या नात्याने गावात अनेक विकासाची कामे मार्गी लावली, वीज, रस्ते,पाणी, पाणी फाऊंडेशनच्या माध्यमातून जलयुक्त शिवार, तसेच वनराई व एल.अँड टी.टी.सी. वनराई बंधारे, पिक संवर्धन,आरोग्य शिबिर,पशुवैद्यकीय शिबिर,बचत गटाच्या माध्यमातून रोजगार असे अनेक विविध क्षेत्रात काम करीत विकासाला दिशा दिली, तसेच राज्यमंत्री आमदार सुरेश धस यांच्या माध्यमातून सामाजिक कार्यकर्ते संदिप खाकाळ यांच्या कुशल नेतृत्व व मार्गदर्शनाखाली गावात अनेक विकास कामे आणली म्हणून एक उपक्रमशील व विकासभिमुख महिला सरपंच म्हणून पुष्पाताई रविंद्र उर्फ बाळासाहेब खाकाळ यांचा दैनिक राज्य लोकतंत्र च्या दुसऱ्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून गौरव करण्यात आला आहे त्यांना या मिळालेल्या सन्मानामुळे अभिमान वाटतो.विकासाच्या दिशेने आपल्या गावाला घेऊन जाण्याचा त्यांचा मानस आहे त्यासाठी त्या प्रयत्नशील आहेत गावचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे,आपले गाव वेगळ्या आदर्शवत उंचीवर पोहोचले पाहिजे यासाठी त्या अतिशय तळमळीने प्रयत्नशील आहेत.सरपंच पुष्पाताई यांनी महिला म्हणून केलेले कार्य नक्कीच उल्लेखनीय आहे. महिलांच्या अनेक प्रश्नांवर व समस्यांवरही त्यांचे काम अतिशय उत्कृष्ट असल्याचे कौतुक वाटते.

**राहुल गोरे,प्रगत शेतकरी शेरी बु!**

## रेल्वे अपघात रोखण्यासाठी एचबीडी, एआरटी यंत्रणा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सोलापूर (वृत्तसंस्था)**

प्रवाशांच्या सुरक्षित आणि सुखकर प्रवासासाठी ज्या काही यांत्रिक सुविधा देता येतील, त्या देण्यात रेल्वेचे यांत्रिक विभाग अग्रस्थानी आहे. कोणत्याही स्वरूपातील रेल्वे अपघात रोखता यावे, यासाठी सोलापूर आणि दौंड येथे ४ हॉटबॉक्स डिटेक्टर्स (एचबीडी), दोन रोड क्सिडेन्ट रिलिफ ट्रेन (एआरटी) याची सुविधा देण्यात आली आहे. तर सोलापूर विभागातील कालबाह्य झालेले ८९ माल डबे आणि २० प्रवासी डबे निष्क्रिय ठरविण्यात आले आहेत. प्रवासी सुरक्षेची सर्वाधिक जबाबदारी ही यांत्रिकी विभागावर आहे. रेल्वेच्या देखरेखीवर अधिकाधिक लक्ष केंद्रित करून सोलापूर रेल्वे विभागाने कामकाजाची गती वाढविली आहे. यामध्ये रेल्वे मालडब्यांच्या रोलिंग स्टोकची कार्यक्षमता तपासणे, यांत्रिक तपासणी करणे, दैनंदिन तपासणीतून प्रतिरेल्वेच्या देखरेख वेळेत कपात करणे, माल डबे व प्रवासी डब्यांची तांत्रिक क्षमता तपासून ते कालबाह्य करणे, प्रवाशांना आरामदायी सेवा पुरविण्यासाठी डब्यांमध्ये बदल करणे, एआरटी व एसबीडी आदी महत्त्वाची कामे रेल्वे सोलापूर विभागाच्या यांत्रिक विभागाकडून करण्यात आली आहेत. सोलापूर रेल्वेच्या सिग्नल आणि टेलिकॉम विभागाने रेल्वेची गती वाढविण्यासाठी ११ रेल्वे स्थानकांवर डबल डिस्टन्स सिग्नल यंत्रणा बसविण्यात आली आहेत. तर वर्षभरात विविध नावीन्यपूर्ण प्रयोगाने कामकाजात सुसूत्रता आणली आहे. सिग्नल आणि टेलिकॉम विभागामुळे रेल्वेच्या परिचालनावर आणि गतीवर नियंत्रण ठेवले जाते. या वर्षभरात संबंधित विभागाने गती प्रतितास १३० कि.मी. वाढविण्याकरिता ११ रेल्वे स्थानकांवर डबल डिस्टन्स सिग्नल यंत्रणा बसवून गती वाढवून प्रवाशांच्या वेळेत बचत केली आहे. त्याचबरोबर सोलापूर विभागात ३८ रेल्वे स्थानकांना इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंग यंत्रणा बसविण्यात आली आहे.दुधनी व मोडनिंब येथे साइडिंग नवीन पॉइंट्स आणि शंट सिग्नलसह यंत्रणा कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. १६० एनालॉग वॉकीटॉकी, सेट डिजिटल केनवुड वॉकीटॉकी मध्ये बदल करण्यात आले आहेत. कुर्डुवाडी येथे १८ कोच इंडिकेटर बोर्ड आदी नावीन्यपूर्ण प्रयोग करण्यात आले आहेत.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904